जा.क्र.शिउसं/प्रशि-४/वै.मा स्टाप्रो/११
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक — १२/७/११

प्रति,

प्राचार्य,

सर्व, अध्यापक विदयालये, पुणे विभाग, पुणे -१.

विषय - सन २०१०-११ चे प्रपत्र क वै.मान्यता व स्टाफ प्रोफाईलचे नियोजित शिबीरा बाबत... अंतिम शिबीर

उपरोक्त विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की, पुणे विभागातील अध्यापक विदयालयांचे स्टाफ प्रोफाईल व वैयक्तिक मान्यता क प्रपत्र सन २०१०-११ चे नियोजित शिबीर पुढील प्रमाणे होणार असून सदर शिबीरास वेळेत उपस्थित राहून स्टाफ प्रोफाईल सादर करावे. सोबत - स्टा.प्रो. सादर करणे संदर्भातील सूचनांचे परिपत्रक जोडले असून त्यानुसार अचूक माहिती व परिपूर्ण प्रस्ताव दाखल होईल असे पहावे.

दि.१३/७/११ -- वैयक्तिक मान्यता — पुणे / अहमदनगर / सोलापूर
दि.१४/७/११-- स्टाफ प्रो फाईल --- अहमदनगर जिल्हा
दि.१५/७/११ -- स्टाफ प्रो फाईल --- पुणे जिल्हा
दि.१६/७/११ -- स्टाफ प्रो फाईल --- सोलापूर जिल्हा

परिपत्रकातील अनु. क्र. १ते १० ची फाईल एक स्वतंत्र मा. शिक्षण उपसंचालक यांचे नांवे असावी व त्या फाईल मध्ये मूळ प्रतीत हमी पत्राची प्रत जोडलेली असावी व एका प्रतीत स्टा.प्रो.प्रत जोडावी . व मा. संचालक ,म.रा.शै.सं. व प्र.प. पुणे ३० यांचे फाईल मध्ये अनु. १ ते ११ सर्व कागदपत्रे जोडण्यात यावीत. त्या फाईल मध्ये तीन प्रतीत स्टा.प्रो. प्रती जोडाव्यात. याची कृपया नोंद घ्यावी.

प्रपत्र क मध्ये मान्यता घेते वेळी प्रपत्र अ व प्रपत्र ब मध्ये ज्या कर्मचा-यांची नांवे नमूद केली आहेत अशा कर्मचा-यांची नावे व प्रपत्र क मध्ये मान्यता सन १०-११ मध्ये प्राप्त झालेल्या कर्मचा-यांची नांवे च फक्त स्टाफ प्रोफाईल मध्ये समाविष्ट करावयाची आहेत. प्रपत्र ब व क मधील जात वैधता नसलेल्या कर्मचा-यांची नांवे स्टा.प्रो. मध्ये समाविष्ट केल्यास होणा-या परिणांस संस्था /प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ज्या अध्यापक विदयालयांचे अदयापी प्रपत्र क वैयक्तिक मान्यता प्रस्ताव दाखल केले नसल्यास अशा अध्यापक विदयालयांचे प्रस्ताव फक्त दि.१३/७/११ रोजीच स्वीकारले जाणार आहेत तदनंतर प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१.